Shri Siddheshwar Devasthan, Solapur.
Shree Siddheshwar Women's College of Engineering, Solapur.
Approved by AICTE, New Delhi, Recognised by Govt. of Maharashtra & Affiliated to DBATU, Lonere
E-mail: office@sswcoe.edu.in | Website: www.sswcoe.edu.in | Phone 0217- 2627227
T.P.S. II, Final Plot No. 74, Bhawani Peth, Rupa Bhawani Mandir Road, Solapur – 413002 M.S.

Date– 02/02/2021

# नोटीस

## (ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जाबाबत )

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, मागासवर्गीय (Reserved Category), राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाहभत्ता योजना (EBC/EWS) व राज्य अल्पसंख्यांक शिष्यवृती योजना (Minority) साठी महाडीबीटी पोर्टलवर विविध योजने करिता ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज करताना ११ वी/१२ वी किंवा डिप्लोमाचे अभ्यासक्रम पूर्ण करत असताना महाडीबीटी पोर्टलवर आधारबेस्ड (प्रोफाईल) लॉगीन तयार केलेले असतात. तदनंतर विद्यार्थिनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये नव्याने विविध अभ्यासक्रमाच्या प्रथम अथवा थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचे **ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता जुनेच नोंदणी (रजिस्ट्रेशन युजर नेम व पासवर्ड) वापरुन ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.**

नवीन महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करताना नॉन आधार बेस्ड रजिस्ट्रेशन केल्यास त्यांचे महाडीबीटी पोर्टलवर दोन रजिस्ट्रेशन होतात (आधारबेस्ड व नॉनआँधारबेस्ड) अशा अर्जामध्ये नॉन आधारबेस्ड अर्ज सादर केलेल्या विद्यार्थिनींचे अर्ज मंजूर झाला तरीही शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही तसेच महाडीबीटी पोर्टलवर जुने आधारबेस्ड रजिस्ट्रेशन झाले असल्याकारणामुळे त्यांना त्यांच्या नविन अर्जामध्ये आधार क्रमांक अपडेट करता येत नाही व असे नॉन-आधार बेस्ड अर्जामध्ये आधार क्रमांक अपडेट न केल्यामुळे कालांतराने अर्ज रद्द होतात व विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचा फायदा मिळत नाही.

**त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करतेवेळी नॉन आधार बेस्ड अर्ज करू नये** व विद्यार्थिनींनी जुने लॉगीन आयडी व पासवर्डद्वारे अर्ज सादर करावे तसेच त्यांचा मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक लिंक करुन घ्यावे अथवा त्यांनी बायोमॅट्रीक प्रणाली वापरून अर्ज सादर करावे.

**सर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी दिनांक १५/०२/२०२१ पूर्वी अर्ज सादर करण्यात यावेत** तदनंतर अर्ज केल्यास व शिष्यवृत्ती अर्ज मंजूर न झाल्यास होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

(डॉ. टी. ए. चव्हाण)
**प्राचार्य**

**प्रत :** १) सर्व विभाग प्रमुख व त्यांच्या मार्फत शाखानिहाय विद्यार्थी व्हॉट्सप ग्रुप,
२) प्रा. ए. एस. निम्बाने, समन्वयक शिष्यवृत्ती विभाग,
३) प्रा. एस. एम. गुंगेवाले, महाविद्यालय वेबसाईट वर प्रकाशित करण्याकरिता,
४) नोटीस बोर्ड व ५) शिष्यवृत्ती फाईल.